'केबीपी'तर्फे सायबर सुरक्षेचे कामगारांना धडे

सातारा, ता. २९ : डिजिटल युगात प्रत्येकाने इंटरनेटचा सुरक्षित वापर करणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. ऑनलाइन व्यवहार, सोशल मीडियावरील माहितीची देवाण- घेवाण आणि कामकाजातील डिजिटल साधनांचा वापर करताना योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. याच उद्देशाने सैदापूर (सातारा) येथे सायबर सुरक्षा जागरूकता कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने शिबिर आयोजित करण्यात आले.

सैदापूर येथील कंपनीतील कामगारांना दिया सकुंडे व पूजा शिंदे यांनी क्विक हिल फाउंडेशनच्या सहकार्याने सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन केले.

सातारा : कार्यशाळेत सहभागी कामगार व विद्यार्थी.

कामगारांना सायबर फसवणूक, फिशिंग ई-मेल व बनावट लिंक ओळखण्याचे मार्ग, ऑनलाइन खरेदी व पेमेंट्समधील सुरक्षितता, तसेच सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या माहितीमुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक, तसेच व्यावसायिक जीवनात सायबर धोके टाळण्यासाठी उपयुक्त माहिती मिळाली.

या वेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एस. सावंत, विभागप्रमुख डॉ. आर. डी. कुंभार, पी. ए. लोखंडे, कंपनीचे मानव संसाधन प्रमुख सचिन माने यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमामुळे उद्योग-व्यवसाय क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबद्दल जागरूकता निर्माण होऊन भविष्यातील सायबर जोखमींवर नियंत्रण मिळवणे शक्य होईल, असा विश्वास यावेळी कामगारांनी व्यक्त केला.